सोलापूर तरुण भारत

# सदाफुली

https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com

बुधवार, १० डिसेंबर २०२५

आतील पानावर

पान २– स्वरावर वजन कमी करण्यासाठी दबाव
पान ३– अनीत पड्डाला मिळाला बिग बजेट चित्रपट
पान ४– प्रियंका–आलिया–कतरिनाचा 'जी ले जरा'
पान ५– दाक्षिणात्य चित्रपटात रामचरणसोबत ...
पान ६– व्ही. शांताराम यांच्या भूमिकेत...




# 'कल्की २' मध्ये प्रियंका चोप्रा?

प्रभासच्या ब्लॉकबस्टर साय-फाय चित्रपट 'कल्की २८९८ एडी'च्या पुढील भागाबाबत चर्चांना वेग आला आहे. विशेषतः, दीपिका पादुकोण या सीक्वलचा भाग राहणार नाही, हे समोर आल्यानंतर अनेक अंदाज रंगू लागले आहेत. मेकर्सनी सप्टेंबरमध्ये एका पोस्टद्वारे दीपिकासोबत ते पुढे काम करणार नसल्याची अधिकृत घोषणा केली होती. मात्र, त्या निर्णयामागील नेमके कारण अद्याप उघड झालेले नाही. काही माध्यमांच्या अहवालांनुसार, दीपिकाने आपल्या शूटिंगच्या तासांवर फक्त ८ तासांची मर्यादा ठेवण्याची अट घातली होती. ही अट निर्मात्यांना मान्य न झाल्याने त्यांनी दीपिकापासून वेगळे होण्याचा निर्णय घेतल्याची चर्चा आहे. दीपिका पादुकोण सीक्वलमध्ये नसल्याचे निश्चित झाल्यानंतर सर्वात मोठा प्रश्न असा निर्माण झाला आहे की, तिच्या भूमिकेसाठी आता कोणाला घेण्यात येईल? आधी साई पल्लवी आणि अनुष्का शेट्टी यांची नावे समोर आली होती. पण आता सोशल मीडियावर आणि अनेक अहवालांमध्ये प्रियंका चोप्राचे नाव सर्वाधिक चर्चेत आहे. ग्लोबल स्टार बनलेल्या प्रियंका चोप्राने फॅशन, मर्ज़ी, बाजीराव मस्तानी, डॉन यांसारख्या चित्रपटांत दमदार भूमिका साकारल्या आहेत. तिच्या ॲक्शन आणि स्क्रीन प्रेझेन्समुळे अनेक चाहते तिला 'कल्की २' मध्ये पाहण्यासाठी उत्सुक आहेत. मात्र, अद्याप मेकर्सकडून याबाबत कोणतीही अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नाही.



एका युजरने विनोदाने लिहिले, काशीबाई अखेर मस्तानीवर मात करणार! तर दुसऱ्या युजरने म्हटले, ही खूप मोठी अपग्रेड कास्टिंग ठरेल. काहींनी मात्र कथेतून दीपिकाच्या कॅरेक्टरची एग्झिट कशी दाखवली जाईल यावर प्रश्न उपस्थित केले. प्रेक्षकांच्या मते, मेकर्स मृत्यू, गायब होणे किंवा टाइमलाइनमध्ये बदल अशा प्लॉटचा आधार घेऊ शकतात. सप्टेंबरमध्ये प्रसिद्ध केलेल्या निवेदनात निर्मात्यांनी म्हटले होते, दीर्घ चर्चेनंतर आम्ही 'कल्की २८९८ एडी' च्या सीक्वलसाठी दीपिका पादुकोणसोबत पुढे न जाण्याचा निर्णय घेतला आहे. तिच्या पुढील प्रवासासाठी आम्ही शुभेच्छा देतो. नाग अश्विन दिग्दर्शित 'कल्की २' हा चित्रपट २०२७ मध्ये रिलीज होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. सध्या चित्रपटाच्या कास्टिंग आणि प्री-प्रोडक्शनचे काम सुरू आहे. चाहते आता पुढील अधिकृत अपडेटची आतुरतेने वाट पाहत आहेत.



# रशियन चित्रपटात पूजा

बॉलिवूड अभिनेत्री पूजा बत्रा आता बॉलिवूड नव्हे तर रशियन चित्रपटातून कमबॅक करत आहे. पूजाने सोशल मीडिया हँडलवर रशियन चित्रपट 'द मॅजिक लॅम्प'ची खास झलक शेअर केली आहे. या चित्रपटाच्या सेटवरील काही छायाचित्रे तिने शेअर केली आहेत. या चित्रपटाचा हिस्सा होता आल्याने आनंदी आहे. कला आणि चित्रपटांना कुठलीच सीमा नसते, असे तिने म्हटले आहे. याचबरोबर पूजाने चित्रपट निर्माता जो राजनसोबत मिळून इंग्रजी लघुपट 'इकोज ऑफ अस' निर्माण केला आहे. हा चित्रपट प्रेम, दु:ख आणि मानवीय नात्यांची कहाणी असून यात सलमान खानची प्रेयसी यूलिया वंतूर देखील दिसून येणार आहे. हा युलियाचा पहिला चित्रपट असून यात दीपक तिजोरी आणि स्पॅनिश अभिनेत्री एलेसेंड्रा व्हेलन मेरेडिज देखील मुख्य भूमिकेत आहे. याची कहाणी जो राजन यांनी लिहिली असून त्यांनीच दिग्दर्शन केले आहे. पूजा बत्राने स्वत:च्या कारकीर्दीची सुरुवात मॉडेलिंगद्वारे केली होती. १९९३ मध्ये मिस इंडिया इंटरनॅशनल ठरल्यावर ती भारताची प्रसिद्ध मॉडेल ठरली होती. तिने २५० हून अधिक फॅशन शोमध्ये भाग घेतला होता. १९९७ मध्ये तिचा पहिला चित्रपट 'विरासत' प्रदर्शित झाला, ज्यानंतर भाई, हसीना मान जाएगी यासारख्या २० हून अधिक चित्रपटांमध्ये पूजा बत्रा हिने काम केले होते.



# पुरुष घटस्फोट घेतात आणि....

आपल्या स्टाइल आणि डान्समुळे चर्चेत राहणारी मलायका तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळेही अनेकदा चर्चेत आली आहे. नुकत्याच एका मुलाखतीत मलायकानं सततच्या टीकेबद्दल मत व्यक्त केलं. वयाच्या २५ व्या वर्षी मलायकानं अभिनेता अरबाज खानबरोबर लग्न केले. मात्र, २०१६ मध्ये लग्नाच्या १९ वर्षांनंतर त्यांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला. ती अर्जुन कपूरबरोबरही रिलेशनमध्ये होती. मात्र, हे नातंही तुटलं. वैयक्तिक आयुष्यातील रिलेशन्समुळे तिला अनेकदा विविध प्रतिक्रियांना सामोरे जावे लागले आहे. पण, या प्रतिक्रिया कायमच स्त्री-पुरुष म्हणून वेगवेगळ्या येत असल्याचं तिनं म्हटलं. मलायका म्हणाली, खंबीर असल्याबद्दल तुम्हाला कायमच जज केलं जातं. माझ्या आयुष्यातील काही पुरुष प्रेरणादायी होते, त्यामुळे मला पुरुषांबद्दल खूप सन्मान आणि प्रेम आहे. पुढे तिने समाज पुरुष आणि स्त्रियांशी एखाद्या विशिष्ट परिस्थितीत कशी वेगवेगळी वागणूक करतो हेही अधोरेखित केलं. याबद्दल मलायका म्हणाली, आज जर एखादा पुरुष त्याच्या आयुष्यात पुढे जाण्याचा निर्णय घेतो, घटस्फोट घेतो किंवा आपल्याहून अर्ध्या वयाच्या एखाद्या मुलीशी लग्न करतो तर लोक लगेच 'अरे वा, काय माणूस आहे' असं म्हणतात. पण, हेच जर एखादी महिला असं काही करते, तर तिला लगेच विचारलं जातं, 'ती असं का करतेय? यानंतर मलायकाने २५ व्या वर्षी लग्न करण्याच्या निर्णयाबद्दल सांगितलं. ती म्हणाली, माझी आई नेहमी म्हणायची, 'आयुष्याचा आनंद घ्या आणि कृपया ज्याला तू पहिल्यांदाच डेट करशील त्याच्याशी लग्न करू नकोस'. जे मी केलं. मी ज्याला डेट केलं, त्या मुलाशीच नंतर लग्न केलं. मी असं केलं हे तिला तेव्हा समजत नव्हतं. ती म्हणालेली, 'जर तू असं केलंस तर तुला कसं कळेल बाहेर काय आहे?' आणि मी म्हणाली होती, 'आई, आता शांत राहा.' तिने आम्हाला स्वप्न पाहायला आणि जीवन जगायला प्रोत्साहित केलं आहे.



# स्वरावर वजन कमी करण्यासाठी दबाव

स्वरा भास्कर ही वीरे दी वेडिंग, रांझना, तनू वेड्स मनू अशा अनेक चित्रपटांसाठी ओळखली जाते. नुकतीच ती तिच्या पतीसह 'पती पत्नी और पंगा' या शोमध्ये सहभागी झाली होती. त्यावेळी स्वराची एक वेगळी बाजू पाहायला मिळाली. स्वरा तिच्या स्पष्टवक्तपणेसाठी ओळखली जाते. अभिनेत्रीने मुलाखतीत तिला एका चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान, तिच्यावर वजन कमी करण्यासाठी खूप दबाव होता असे वक्तव्य केले आहे. या मुलाखतीत तिने कबुल केले की, 'वीरे दी वेडिंग' चित्रपटातील भूमिका साकारणे सगळ्यात आव्हानात्मक होते. ती म्हणाली, तुम्हाला आश्चर्य वाटेल, पण 'वीरे दी वेडिंग'मधील माझी भूमिका साकारण्यासाठी सर्वात अवघड होती. भूमिकेनुसार आपली देहबोली कशी असायला हवी, संवाद कसे बोलले गेले पाहिजेत, त्यातील ओळी कशा बोलल्या पाहिजेत याची मी तयारी करते. 'वीरे दी वेडिंग'मधील माझी भूमिका ग्लॅमरवर केंद्रित होती. कपडे, दिसणं या गोष्टी संबंधित होत्या. विशेष म्हणजे बारीक दिसणेदेखील त्या पात्रासाठी गरजेचे होते, त्यासाठी वजन कमी करण्याचा दबाव होता. ती भूमिका साकारताना जितका ताण मला जाणवला, तितका तणाव माझ्या कारकिर्दीत मी कधीही अनुभवला नव्हता. तो माझ्या आवाक्याबाहेरचा होता. सुदैवाने रिया चित्रपटाची स्टायलिस्टदेखील होती. तिच्या स्टायलिंगचे टॅलेंट हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील आहे, म्हणून मी खूप आनंदात होते. शेवटी चित्रपट उत्तम झाला. 'वीरे दी वेडिंग' चित्रपटात तारीफां हे गाणे आहे. या गाण्यात स्वराने बॉडीसूट घातला होता. त्याचा अनुभव सांगत ती म्हणाली, दररोज उत्तम दिसणे हे कठीण असते. शूटिंगदरम्यान त्यांनी दिलेले काही कपडे पाहून मी त्यांना विचारायचे की हे काय आहे? मला आठवतं, जेव्हा तारीफां गाण्याच्या शूटिंगवेळी मी बॉडीसूट घातले होते, तो खर`तर वनपीस स्विमिंगसूट असतो, त्यावर बूट किंवा हिल्स घालतात. अशा सर्व गोष्टींमुळे ती भूमिका साकारणे आव्हानात्मक होते. स्वराच्या कामाबद्दल बोलायचे तर अभिनेत्री २०२६ मध्ये 'मिसेस फलानी' आणि 'शिर कुरमा' चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# अनीत पड्डाला मिळाला बिग बजेट चित्रपट



बॉलिवूडमध्ये यंदा सैयारा चित्रपटाची मोठी चर्चा राहिली आहे. या चित्रपटात कुठलाच मोठा कलाकार नव्हता तरीही तो यशस्वी ठरला. चित्रपटातून अहान पांडे आणि अनीत पड्डा यांनी पदार्पण केले होते. अनीत आणि अहान यांची केमिस्ट्री प्रेक्षकांना पसंत पडील होती. आता या चित्रपटानंतर अनीतचे नशीब फळफळले असून तिला एक मोठा बिगबजेट चित्रपट मिळाला आहे. मॅडॉक फिल्म्सकडून सध्या अनेक चित्रपट निर्माण केले जात असून त्यांना प्रेक्षकांकडून मोठा प्रतिसादही मिळत आहे. 'थामा'नंतर मॅडॉक फिल्म्स आता 'शक्तिशालिनी' चित्रपट निर्माण करत असून यात अनीत पड्डा दिसून येणार आहे. या चित्रपटात अनीतची मुख्य भूमिका असणार आहे. हा चित्रपट २४ डिसेंबर रोजी प्रदर्शित होणार आहे. यापूर्वी या चित्रपटासाठी कियारा अडवाणीची निवड करण्यात आली होती. परंतु काही कारणास्तव तिला हा चित्रपट सोडावा लागला होता. आता अनीतची या चित्रपटात एंट्री झाली आहे. मॅडॉक फिल्म्सच्या प्रोजेक्टमध्ये संधी मिळाल्याने अनीतच्या कारकीर्दीला बूस्ट मिळणार आहे.

# बॉलीवूड खूप नकलीय

बॉलीवूडमधल्या पार्ट्या, कलाकारांचे खास कनेक्शन आणि लॉबी यांबद्दल अनेकदा चर्चा होत असतात. अशातच अभिनेते, संगीतकार व गायक पीयूष मिश्रा यांनी बॉलीवूडबद्दल स्पष्ट मत व्यक्त केलं आहे. त्यांनी बॉलीवूडचा 'नकली' असा उल्लेख केला आहे. अलीकडेच त्यांनी बॉलीवूड इंडस्ट्री आणि तिथल्या लोकांबद्दल स्पष्ट मत व्यक्त केलं. यावेळी त्यांना मुंबईला जाण्याच्या कारणाबद्दल विचारले असता ते म्हणाले, मी हीरो बनण्यासाठी मुंबईला गेलो होतो; पण ते वयच निघून गेलेलं होतं. मुंबईला मी मुख्यतः पैसा कमवण्यासाठी गेलो. आई, बायको आणि मुलाला चांगलं आयुष्य मिळावं म्हणून मी मुंबईची वाट धरली. त्यानंतर त्यांनी बॉलीवूड इंडस्ट्री 'नकली' असल्याचं स्पष्टपणे म्हटलं, बॉलीवूड कसं ठिकाण आहे? या प्रश्नावर ते म्हणाले, नकली आहे खूप नकली आहे. मला इंडस्ट्रीनं खूप काही दिलंय; पण ती नकली आहे, असं माझं मत आहे. मी शूटिंग संपलं की, थेट घरी निघून येतो. ना कुठली पार्टी, ना कसलं गेट-टुगेदर. इंडस्ट्रीत माझे फारसे मित्रही नाहीत. अनुराग कश्यप, विशाल भारद्वाज किंवा इम्तियाज अली, असे काही मोजकेच लोक आहेत; ज्यांच्यासोबत मला काम करायला आवडतं. पीयूष पुढे म्हणाले, तुम्ही स्टारडममध्ये अडकलात की, आयुष्य तिथेच थांबतं. मग काहीतरी वेगळं करण्याची ताकद राहत नाही. मी काही स्टार नाही. स्टार म्हणजे ज्याच्यावर निर्माता पैसा लावायला तयार असतो. माझ्यावर तसा पैसा कोणी लावत नाही. 'रॉकस्टार'मुळे मला ओळख मिळाली, हे माझं यश आहे; पण मी फार मिळून-मिसळून वागणाऱ्यातला नाही. पार्ट्यांना गेलं की, काम मिळतं हा चुकीचा समज आहे. माझ्या मते, तुम्हाला तुमच्या पहिल्या कामामुळेच दुसरं काम मिळतं. पुढे पीयूष म्हणाले, जर तुम्हाला काम चांगलं येत असेल, तर इंडस्ट्री तुम्हाला काम देईल. बॉलीवूडमध्ये तुमचा पाय घसरण्याच्या असंख्य वाटा आहेत. गांजा, दारू, चरस, मुली इथे सगळंच सहज उपलब्ध आहे. अशा वातावरणात राहून काम करणं अवघड असतं. दरम्यान, काही दिवसांपूर्वी एका मुलाखतीत त्यांनी, बॉलीवूड कलाकारांचे खूप नखरे असतात, असंही विधान केलं होतं. बॉलीवूडच्या कलाकारांच्या अवाजवी मागण्यांबद्दल पीयूष म्हणालेले, अनेक कलाकार किमान आठ लोकांबरोबर फिरतात आणि १२ बॉडीगार्ड तर कायम असतात. एका माणसाला हे इतके जण कशाला हवेत? मला यामागचा अर्थच समजत नाही. अशातच आता त्यांनी बॉलीवूडची दुसरी बाजूही सांगितली आहे.

# माझ्याकडे बंदूक नव्हती तरी...



बॉलीवूड अभिनेता संजय दत्तला शस्त्र कायद्याचं उल्लंघन केल्याप्रकरणी पाच वर्षांची शिक्षा झाली होती. याप्रकरणी शिक्षा भोगताना त्याला काही वेळेस जामीनही मिळाला, नंतर २०१६ मध्ये त्याची यातून सुटका झाली. संजय दत्तच्या आयुष्यातील हा काळ रणबीर कपूरच्या 'संजू' या बायोपिकमध्येही दाखवण्यात आला होता. याच काळाबद्दल संजय दत्तनं नुकतीच प्रतिक्रिया दिली आहे. एका शो'मध्ये अभिनेत्याने त्याच्या या काळाविषयी मोकळेपणाने सांगितलं. तो म्हणाला, माझ्या वडिलांना आणि बहिणींना धमक्या येत होत्या. लोक म्हणत होते की, माझ्याकडे बंदूक आहे. मला आजही कळत नाही की नेमकं काय झालं आणि मला तुरुंगात जावं लागलं. मी फक्त एवढेच म्हणू शकतो की, २५ वर्षांनी टाडा किंवा बॉम्बस्फोट प्रकरणात मी दोषी नाही हे त्यांना समजलं, माझ्याकडे कोणतीच बंदूक नसतानाही मला शस्त्र कायद्याअंतर्गत दोषी ठरवलं; या सगळ्यासाठी २५ वर्ष का लागली ते मला अजून कळलं नाही. तो काळ खूप काही शिकवून गेला असल्याचंही संजय दत्तनं म्हटलं. याबद्दल तो म्हणाला, या घटनेला मी माझ्या आयुष्याचा एक भाग मानतो. यादरम्यान मी कायद्याची काही पुस्तकं वाचली. मी तुरुंगातील तो काळ सन्मानाने भोगला. तिथे मी खूप वेळ वाचन, प्रार्थना आणि जप केला. ध्यान केलं. शिवपुराण, गणेशपुराण, भगवद्गीता, रामायण, महाभारत अशी बरीच पुस्तकं मी तिथे वाचली. त्या काळात मी कधीही आशा सोडली नाही, असंही त्यानं सांगितलं. याबद्दल संजय दत्त म्हणाला, मला पाच वर्षांनी बाहेर यायचंच होतं. पण तेव्हा माझी फक्त एवढीच विनंती होती की, आदरणीय न्यायाधीशांनी आणि सरकारी वकिलांनी माझा खटला लवकरात लवकर निकाली काढावा, कारण मी तुरुंगात अनेक लोकांना वर्षानुवर्षे तिथे अडकून पडलेलं पाहिलं आहे. दरम्यान, 'द ग्रेट इंडियन कपिल शर्मा शो' मध्येही संजय दत्तनं तुरुंगातील काळाविषयी काही किस्से सांगितलेले. तो म्हणालेला, मी तिथे काम करून पैसे कमवत होतो. कधी खुर्च्या बनवल्या, कधी कागदी पिशव्या बनवल्या. त्यासाठी मला मजुरी मिळायची. मी तिथे रेडिओ स्टेशनही सुरू केलं होतं, त्यात चर्चा, विनोद, वादविवाद असायचं. तीन कैदी माझे स्क्रिप्ट लिहायचे. त्यासाठीही पैसे मिळायचे.

# प्रियंका-आलिया-कतरिनाचा 'जी ले जरा' येतोय

'जी ले जरा' या चित्रपटाची घोषणा चार वर्षांपूर्वी करण्यात आली होती. या चित्रपटात पहिल्यांदाच प्रियंका चोप्रा, आलिया भट आणि कतरिना कैफ एकत्र काम करणार होत्या. मात्र, चित्रपटाच्या निर्मितीमध्ये काही ना काही कारणांमुळे अडथळे येत राहिले. त्यामुळे आता हा चित्रपट बनणार नाही, असे तर्कवितर्क लावले जात होते. पण आता या अफवांवर खुद्द चित्रपटाचा दिग्दर्शक आणि अभिनेता फरहान अख्तरने प्रतिक्रिया देऊन त्या अफवा फेटाळून लावल्या आहेत. फरहान लवकरच आपला आगामी चित्रपट 'जी ले जरा'वर काम सुरू करणार आहे. तो म्हणाला की, तो अजूनही या प्रोजेक्टवर काम करत आहे. त्याने हे मान्य केले की, काही व्यग्र वेळापत्रकांमुळे तो या प्रोजेक्टकडे लक्ष देऊ शकला नव्हता, त्यामुळे ते थांबवण्यात आले होते. पण आता तो पुन्हा यावर काम सुरू करेल. फरहान 'जी ले जरा'साठी खूप उत्सुक होता. मात्र, तिन्ही अभिनेत्रींच्या तारखा न जुळल्यामुळे ते खूप चिंतेत होते. आता मात्र, सर्व अडचणी दूर झाल्या आहेत, अशी कबुली फरहानने दिली आहे. त्यामुळे तो लवकर या चित्रपटावर काम सुरू करेल. मालती मेरी जोनासच्या जन्मानंतर प्रियंकाने या चित्रपटात काम करण्यास नकार दिला होता. तर आलिया आणि कतरिना कैफ इतर प्रोजेक्ट्समध्ये व्यग्र असल्याने या चित्रपटावर लक्ष केंद्रित करू शकल्या नव्हत्या.



# मीना कुमारींच्या बायोपिकमध्ये कियारा

प्रसिद्ध डिझाइनर मनीष मल्होत्रा मीना कुमारी यांच्या जीवनावर आधारित एक चित्रपट निर्माण करणार आहेत. या चित्रपटात क्रीति सेनॉन ही मीना कुमारी यांची व्यक्तिरेखा साकारणार होती. परंतु तिचा पत्ता आता कट झाला असल्याचे समोर आले आहे. तिच्याऐवजी अन्य अभिनेत्रीची निवड करण्यात आल्याचे समजते. कियारा अडवाणी ही आता या चित्रपटात मीना कुमारींच्या व्यक्तिरेखेत दिसून येणार आहे. निर्माते बिलाल अमरोही चित्रपटात मीना कुमारी आणि त्यांचे पती कमल अमरोही यांची कहाणी दाखविणार आहेत. मीना कुमारी यांच्या व्यक्तिरेखेकरता कियारा अत्यंत योग्य अभिनेत्री असल्याचे निर्मात्यांचे मानणे आहे. कियारा या चित्रपटाकरता उर्दू भाषा शिकण्याचा प्रयत्न करणार असल्याचे बोलले जात आहे. या चित्रपटाचे चित्रिकरण पुढील वर्षी सुरू होणार आहे. अभिनेत्रीने अलिकडेच अपत्याला जन्म दिला आहे, चित्रिकरणाला अद्याप विलंब असल्याने कियाराला याच्या तयारीकरता मोठा वेळ मिळणार आहे. तर कमल अमरोही यांच्या व्यक्तिरेखेसाठी अद्याप अभिनेत्याची निवड करण्यात आलेली नाही. तर चित्रपटाचे नाव 'कमल और मीना' असेल.

# 'तो' माझ्यासाठी आयुष्यातील सर्वात काळा अध्याय

सनी देओलने आतापर्यंत अनेक सुपरहिट चित्रपट दिले आहेत. त्याच्या करिअरमध्ये त्याचे काही जणांशी वादही झाले. त्यातलं एक नाव म्हणजे दिग्दर्शक सुनील दर्शन. अंदाज, बरसात, अजयसारख्या चित्रपटांचे दिग्दर्शक सुनील दर्शन यांचे अक्षय कुमार, सनी देओल यांच्यासह काही स्टार्सशी मतभेद झाले. सुनील यांनी सनी देओलला 'आयुष्यातील सर्वात काळा अध्याय' असं म्हटलं. सुनील यांनी अलीकडेच एक मुलाखत दिली. सनी देओलबरोबर काम करणे म्हणजे एखाद्या लहान मुलाबरोबर काम करण्यासारखं आहे, असं वक्तव्य सुनील यांनी मुलाखतीत केलं. सनी 'जानवर' चित्रपटात काम करणार होता, पण सुनील यांच्याबरोबरच्या वादानंतर तो सिनेमा अक्षय कुमारने केला. अक्षय व सुनील यांनी सात चित्रपट एकत्र केले, पण नंतर मात्र त्यांच्यातही मतभेद झाले आणि दोघांनी परत कधीच एकत्र काम केलं नाही. अक्षय कुमारचं कौतुक करत सुनील सनी देओलबद्दल म्हणाले, अक्षय अजिबात वाईट माणूस नाही. त्याला खूप बदनाम करण्यात आलंय. तो गुणी आहे हे तुम्ही नाकारू शकत नाही. सनी देओल माझ्या आयुष्यातील आणि करिअरमधील सर्वात काळा अध्याय आहे, पण देव आहे, तो सगळं बघतोय, तो न्याय करेल. सनी देओलबरोबरचा वाद नेमका काय होता, तेही सुनील यांनी सांगितलं. ते खूप शक्तिशाली लोक आहेत आणि त्यांना कशाचाच फरक पडत नाही. पण या सगळ्याचा न्याय कधीतरी होईलच याची खात्री आहे. काही गोष्टी इतक्या वाईट आहेत, ज्या मी शब्दांत सांगू शकत नाही. मी त्याच्याबरोबर तीन चित्रपट केले, मी माझा पहिला चित्रपट 'इंतेकाम' त्याच्याबरोबर केला. त्यावेळी तो स्टार नव्हता. मी त्याच्या बऱ्याच चित्रपटांचं वितरण केलं. त्याला ज्या चित्रपटातून लाँच करण्यात आलं, त्यात माझं मोठं योगदान होतं. मी त्याच्यावर विश्वास ठेवला. मला वाटलं की चित्रपटसृष्टीला त्याच्यासारख्या लोकांची गरज आहे. इंतेकाम करताना मी थोडा गोंधळलो होतो. पण 'लूटेरे' हा दुसरा चित्रपट करताना मला त्याच्या वागण्यात फरक जाणवला. पण तिसऱ्यांदा जेव्हा एकत्र काम करत होतो, तेव्हा काहीतरी गडबड आहे याची मला खात्री पटली. प्रॉडक्शनदरम्यान मला वाईट अनुभव आले. मला तो खूप महागात पडला. ते एखाद्या लहान मुलाचे लाड पुरवून काम पूर्ण करायला लावण्यासारखं होतं. मला त्याच्याबरोबर चौथा चित्रपट करायचा नव्हता, पण मी अडकलो होतो. त्याने माझ्या भावनांचा वापर केला, खोट्या गोष्टी सांगितल्या आणि तो स्वतःसाठी करत असलेल्या एका प्रकल्पात त्याने मला सामील करून घेतलं, असं सुनील दर्शन म्हणाले. दरम्यान, सुनील दर्शन यांनी एकेकाळी सनीबरोबर काही चित्रपट केले होते, पण या अनुभवांनंतर परत त्यांनी कधीच एकत्र काम केलं नाही. अक्षय कुमारच्या बाबतीतही असंच घडलं. सात चित्रपट केल्यानंतर अक्षय व सुनील दर्शन यांची जोडी वेगळी झाली. ते परत कधीच एकत्र दिसले नाहीत.





# 'बंगाराम' चित्रपटात समांथा

अभिनेता राज निदिमोरू, समांथा रुथ प्रभू आणि हिमांक डुव्वुरु यांनी स्वत:चा बॅनर त्रालाला मूव्हिंग पिक्चर्स अंतर्गत 'मां इंति बंगाराम' चित्रपटाचे चित्रिकरण सुरू केले आहे. याची छायाचित्रे समांथाने सोशल मीडिया हँडलवर शेअर केली आहेत. या छायाचित्रांमध्ये समांथाचा कथित बॉयफ्रेड राज निदिमोरूही दिसून आला आहे. प्रेम आणि आशीर्वादासोबत मां इंति बंगारामच्या मूहूर्तासोबत स्वत:चा प्रवास सुरू केला आहे. आम्ही जे निर्माण करत आहोत, त्याला तुमच्यासोबत शेअर करण्यासाठी उत्सुक आहे. या चित्रपटाच्या सुरुवातीला आम्हाला तुमचे प्रेम आणि समर्थनाची आवश्यकता आहे, असे समांथाने स्वत:च्या पोस्टमध्ये नमूद पेल आहे. हा चित्रपट १९८० च्या दशकातील पार्श्वभूमीवर आधारित एक रोमांचक क्राइम थ्रिलर आहे. समांथा ही 'मां इंति बंगाराम'च्या व्यतिरिक्त नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणाऱ्या 'रक्तब्रह्मांड: द ब्लडी किंगडम' या सीरिजमध्ये दिसून येणार आहे. यापूर्वी समांथा ऊथ प्रभू ही स्वत:च्या प्रॉडक्शन हाउस अंतर्गत निर्मित पहिला चित्रपट 'शुभम'मध्येही पाहुण्या कलाकाराच्या भूमिकेत दिसून आली होती.

# दाक्षिणात्य चित्रपटात रामचरणसोबत जान्हवी





अभिनेत्री दिग्दर्शक बुची बाबू सना यांचा बहुप्रतीक्षित ॲक्शनपटात अभिनेत्री जान्हवी कपूर झळकणार आहे. हा एक ॲक्शन थ्रिलर चित्रपट असून यात ती अचियम्मा नावाची भूमिका साकारत आहे. या चित्रपटात राम चरण मुख्य भूमिकेत जान्हवी आता दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत स्वत:चा जम बसवू पाहत असल्याचे मानले जात आहे. या चित्रपटातील जान्हवीचा फर्स्ट लुक सादर करण्यात आला आहे. निर्मात्यांनी जान्हवीची दोन पोस्टर्स जारी केली असून त्यात तिची भूमिका अत्यंत उग्र आणि निडर असेल, असे कळते या चित्रपटाचे चित्रिकरण श्रीलंकेत पार पडणार आहे. हा चित्रपट २७ मार्च २०२६ रोजी प्रदर्शित केला जाणार आहे. पेी चित्रपटाच्या युनिटने अलिकडेच १००० डान्सर्ससोबत याच्या एका गाण्याचे चित्रिकरण पूर्ण केले आहे. रामचरणवर हे भव्य गीत चित्रित करण्यात आले असून याचे नृत्यदिग्दर्शन जानी मास्टरने केले आहे. राम चरणने या भूमिकेसाठी मोठी तयारी केली आहे. त्याने स्वत:च्या लुकला पूर्णपणे ट्रान्सफॉर्म केले आहे. जान्हवीने यापूर्वी एका तेलगू चित्रपटात ज्युनियर एनटीआरसोबत काम केले होते.



# रश्मिकाने दिले लग्नाचे संकेत

दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील लोकप्रिय कपल म्हणजे अभिनेत्री रश्मिका मंदाना आणि अभिनेता विजय देवरकोंडा. रश्मिका आणि विजय येत्या फेब्रुवारीत लग्न करणार असल्याची चर्चा आहे. काही दिवसांपूर्वीच विजय-रश्मिका यांनी गुपचूप साखरपुडाही केला, तेव्हापासून दोघांच्या चाहत्यांना त्यांच्या लग्नाची उत्सुकता लागून राहिली आहे. अशातच विजयबरोबरच्या लग्नाच्या चर्चांवर रश्मिकानं प्रतिक्रिया दिली आहे. रश्मिका आणि विजय यांनी ऑक्टोबरमध्ये हैदराबादमध्ये साखरपुडा केला. अनेक वृत्तांनुसार, हे दोघे येत्या फेब्रुवारीमध्ये लग्न करण्याची शक्यता आहे. अर्थात, याबद्दल विजय आणि रश्मिका यांनी अद्याप कोणतीही अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही. अशातच अलीकडे एका मुलाखतीत रश्मिकाला विजयबरोबरच्या लग्नाबद्दल विचारले असता तिने मोजक्या शब्दांत उत्तर दिलं. रश्मिकाने विजय देवरकोंडाबरोबरच्या लग्नाबद्दलच्या चर्चांवर प्रतिक्रिया दिली. ती म्हणाली, मी आत्ता लग्नाबाबत हो किंवा नाही असे काहीही सांगू इच्छित नाही, योग्य वेळ आली की आम्ही स्वत:च याबद्दल बोलू. यानंतर तिनं तिच्या कामाबद्दल घरात चर्चा करत नसल्याचं म्हणत विषय बदलला. रश्मिका पुढे म्हणाली की, ती घरी कामाबद्दल चर्चा करत नाही, अगदी विजयबरोबरही नाही. अभिनेत्री म्हणाली, आम्ही दोघंही कलाकार आहोत, पण मी घरी गेल्यानंतर कामापासून पूर्णपणे दूर राहू इच्छिते. मी घरात कामाची चर्चा करत नाही. घरात असताना मला कामापासून दूर राहायला आवडतं. तुम्ही २४ तास काम करू शकत नाही, कामाबद्दल बोलणंसुद्धा कामाचा भाग आहे.

# विजय देवरकोंडाच्या चित्रपटात हॉलिवूडचा खलनायक

तेलुगू चित्रपट प्रेक्षकांसाठी एक मोठी बातमी आहे. हॉलिवूड ब्लॉकबस्टर द ममी मधील भयानक भूमिकेसाठी जगभरात ओळख मिळवणारा अभिनेता अर्नोल्ड वोसलू भारतीय पडद्यावर पुन्हा एकदा कमबॅक करण्यासाठी सज्ज झाला आहे. नुकताच तो हैदराबादमध्ये विजय देवरकोंडाच्या पीरियड ॲक्शन ड्रामा व्हीडी १४ च्या सेटवर दिसला. वृत्तानुसार, अर्नोल्ड वोस्लू या चित्रपटात एका शक्तिशाली ब्रिटिश अधिकाऱ्याची भूमिका साकारत आहेत. एक अशी व्यक्तिरेखा जी कथेच्या मध्यभागी असलेल्या संघर्षाला तीव्र करेल. १८५४ ते १८७८ च्या अशांत काळात घडणारा हा कालखंड नाटक वसाहतवादी राजवट, लोकप्रिय उठाव आणि संघर्षाच्या पार्श्वभूमीवर विणलेली कथा सादर करेल. या चित्रपटात, अभिनेता विजय देवरकोंडा आणि दिग्दर्शक राहुल सांकृत्यायन टॅक्सीवाला नंतर पुन्हा एकदा एकत्र काम करत आहेत. विजयच्या वाढदिवशी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाच्या पहिल्या पोस्टरमध्ये तो एका ध्यानस्थ योद्धा- संताच्या भूमिकेत दाखवला आहे. देवरकोंडाच्या शहरी प्रतिमेपासून पूर्णपणे वेगळे असलेले एक पात्र. रायलसीमाच्या मातीत घडणारी ही कथा एका खडतर योद्ध्याच्या प्रवासाचे वर्णन करते. मोठ्या प्रमाणात चित्रपट निर्मितीसाठी ओळखल्या जाणाऱ्या दक्षिण भारतातील आघाडीच्या निर्मिती कंपनी, मिथ्री मूव्ही मेकर्स या चित्रपटाची निर्मिती करत आहे.

# व्ही. शांताराम यांच्या भूमिकेत दिसणार सिद्धांत



भारतीय चित्रपटसृष्टीला नवी दृष्टी, नवे तत्त्वज्ञान आणि नवी सौंदर्यभाषा देणारे व्ही. शांताराम यांचे असामान्य, प्रेरणादायी आणि वैभवशाली जीवन आता पहिल्यांदाच एका भव्यदिव्य चित्रपटाच्या महाकाव्यातून उलगडणार आहे. 'व्ही. शांताराम यांच्या प्रत्येक कलाकृतीने भारतीय चित्रपटाला नवी दिशा दिली. त्यांचे संपूर्ण आयुष्य म्हणजे संघर्ष, सर्जनशील ध्यास आणि जग बदलण्याच्या अढळ विश्वासाची उज्ज्वल परंपराच. 'व्ही. शांताराम' या चित्रपटाचे पहिले पोस्टर नुकतेच प्रदर्शित झाले असून सोशल मिडियावर या पोस्टरने धुमाकूळ घातला आहे. यातील वैभव, भव्यता, दृश्य पाहून प्रेक्षकांमध्ये उत्सुकतेची नवी लाट उसळली आहे. या चित्रपटात सिद्धांत चतुर्वेदी व्ही. शांताराम यांच्या भूमिकेत झळकणार असून ही भूमिका त्याच्या कारकिर्दीतील एक गेम चेंजर ठरणार आहे. दिग्दर्शक अभिजित शिरीष देशपांडे यांनी या चित्रपटाचे लेखन, दिग्दर्शन केले असून भव्य दृश्यरचना आणि कलात्मक दृष्टीने त्यांनी या चित्रपटाला एका विशिष्ट उंचीवर नेले आहे. दिग्दर्शक अभिजित शिरीष देशपांडे म्हणाले, ''व्ही. शांताराम हे नाव उच्चारताना केवळ एका व्यक्तीची चर्चा होत नाही, तर भारतीय चित्रपटाची संपूर्ण तत्त्वज्ञानपर परंपरा डोळ्यांसमोर उभी राहते. त्यांच्या आयुष्यातील संघर्ष, त्यांची निष्ठा, प्रयोगांची भीती न बाळगता कलाप्रवाहात झेप घेण्याची त्यांची हिंमत हे सर्व पडद्यावर साकारताना एक वेगळीच आध्यात्मिक अनुभूती मिळाली. या चित्रपटातील प्रत्येक फ्रेम, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची उंची प्रेक्षकांपर्यंत पोहोचावी, हाच माझा प्रयत्न आहे. निर्माते राहुल किरण शांताराम म्हणाले, ''हा चित्रपट म्हणजे माझ्यासाठी केवळ प्रोजेक्ट नसून ती एक भावना आहे. हा चित्रपट म्हणजे आमच्या सर्वांकडून आजोबांच्या कर्तृत्वाला वाहिलेली भव्य श्रद्धांजली आहे. राजकमल एंटरटेनमेंट, कॅमेरा टेक फिल्म्स ॲण्ड रोअरिंग रिव्हर प्रोडक्शन प्रस्तुत या चित्रपटाचे राहुल किरण शांताराम, सुभाष काळे आणि सरिता अश्विन वर्दे निर्माते आहेत. येत्या नवीन वर्षात हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे.



# प्रथमेश आणि पॅडीच्या हुक्कीचा फर्स्ट लुक प्रदर्शित

हॉरर-कॉमेडीपटांनी नेहमीच रसिकांना भुरळ घातली आहे. चार मित्रांची गोष्ट सांगणारा 'हुक्की' हा आगामी मराठी चित्रपटही क्षणाक्षणाला प्रेक्षकांची उत्कंठा वाढविणारा आहे. 'हुक्की'च्या पहिल्या पोस्टरनंतर या चित्रपटाचा फर्स्ट लुक नुकताच प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. दमदार कलाकारांची फौज आणि प्रवाहापेक्षा वेगळा विषय असल्याने 'हुक्की'च्या फर्स्ट लुकने प्रदर्शित झाल्यापासूनच रसिकांचे लक्ष वेधले आहे. सोशल मीडियावर 'हुक्की'च्या फर्स्ट लुकची जोरदार चर्चा रंगू लागली आहे. हिंदी सिनेसृष्टीतील आघाडीचा अभिनेता वरुण धवनने 'हुक्की'चा फर्स्ट लुक आपल्या सोशल मीडियावर शेअर केला आहे. निर्माते नितीन रोकडे, सुनंदा काळुसकर, विनायक पाष्टे, श्वेता संजय ठाकरे तसेच सहनिर्माते सुधीर खोत आणि रईस खान यांनी मॅजिक स्वान स्टुडिओज आणि एनएमआर मुव्हीज या बॅनरखाली 'हुक्की' चित्रपटाची निर्मिती केली आहे. कथालेखनासोबतच 'हुक्की'चे दिग्दर्शन नितीन रोकडे यांनी केले आहे. 'हुक्की'चा फर्स्ट लुक खऱ्या अर्थाने रसिकांचा उत्साह वाढविणारा आहे.


महाराष्ट्राचा लाडका अभिनेता प्रथमेश परब आणि विनोदाचा बादशाह पंढरीनाथ कांबळे उर्फ पॅडी या चित्रपटात एकत्र झळकणार आहेत. फर्स्ट लुक बाबत नितीन रोकडे म्हणाले की, 'हुक्की'च्या कथानकाचा बाज लक्षात घेऊन फर्स्ट लुक तयार करण्यात आला आहे. हा फर्स्ट लुक अत्यंत कमी वेळात आपले काम चोख बजावणारा आहे. हॉरर- कॉमेडीपटासाठी पोषक ठरणारी वातावरणनिर्मिती, कलाकारांचा लूक, पार्श्वसंगीत, सबटायटल्स यांचा सुरेख वापर 'हुक्की'च्या फर्स्ट लुकमध्ये आहे. त्यामुळे प्रेक्षकांना सिनेमागृहांपर्यंत आणण्यात फर्स्ट लुक महत्वाची भूमिका बजावणार आहे. दिग्दर्शक नितीन रोकडे यांनी संदीप कुमार रॉय आणि मधुलीता दास यांच्यासोबत 'हुक्की'ची पटकथाही लिहिली आहे. या चित्रपटात प्रथमेश- पॅडीसोबत रावी किशोर, प्रशांत मोहिते, महेश पाटील, आरती चौबल, वर्षा धांदले, मोहक कंसारा आणि पंकज विष्णू आदी कलाकार आहेत. संगीतकार राघवेंद्र व्ही आणि प्रफुल- स्वप्नील यांनी या चित्रपटातील गीतरचना संगीतबद्ध केल्या असून साऊथमधील सुप्रसिद्ध संगीतकार राघवेंद्र व्ही 'हुक्की'द्वारे मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण करीत आहेत.

# अमृता खानविलकरची नवी इनिंग!



अभिनेत्री अमृता खानविलकर मराठी सिनेइंडस्ट्रीतील प्रसिद्ध अभिनेत्री आहे. तिने मराठीसह हिंदीतही आपले स्थान निर्माण केले आहे. ती अभिनेत्रीशिवाय उत्तम नृत्यांगणादेखील आहे. अमृताने सिनेमा आणि मालिकेत काम केल्यानंतर आता ती नवीन माध्यमात पदार्पण करते आहे. लवकरच ती रंगभूमीवर पदार्पण करत आहे. 'लग्न पंचमी' या नाटकात ती दिसणार आहे. याबद्दल तिने सोशल मीडियावर सांगितलं आहे. अमृता खानविलकरने २००४ साली छोट्या पडद्यावर पदार्पण केले आणि २००६ साली ती रुपेरी पडद्यावर झळकली. त्यानंतर आता तब्बल २० वर्षांनंतर रंगभूमीवर पदार्पण करते आहे.

रिपोर्ट्सनुसार, अमृता लग्न पंचमी या मराठी नाटकातून रंगभूमीवर डेब्यू करत आहे. या नाटकाचे लेखन मधुगंधा कुलकर्णीने केले आहे तर दिग्दर्शन निपुण धर्माधिकारी करतो आहे. हे नाटक लवकरच रंगभूमीवर दाखल होणार आहे. या नाटकाबद्दल अमृता खानविलकर म्हणाली की, मला नेहमीच निपुण आणि मधुगंधा यांच्यासारख्या लोकांसोबत काम करण्याची इच्छा होती. मला वाटते की ते प्रोजेक्टना एक वेगळा आणि नवा दृष्टिकोण देतात आणि मला त्यांचे खूप कौतुक वाटते. अमृताने सोशल मीडियावर शेअर केलेल्या पोस्टवर चाहते लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. ते तिला रंगभूमीवर काम करताना पाहण्यासाठी उत्सुक आहेत. अमृताने नटरंग, चंद्रमुखी, ३६ डेज, जिवलगा, चोरीचा मामला, कट्यार काळजात घुसली या मराठीसह सत्यमेव जयते, राझी, मलंग या हिंदी सिनेमात काम केले आहे. शेवटची ती द ताज स्टोरीमध्ये झळकली. यात परेश रावल मुख्य भूमिकेत आहेत.



# मखमली शृंगाराचे रेशमी गझलकारः सुरेश भट

'सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या, तुझेच मी गीत गात आहे, अजूनही वाटते मला की, अजूनही चांद रात आहे...' वरील गाणे म्हणजे शब्दप्रभू सुरेशजींच्या शब्दांची मैफलच! विरहिणीच्या अंगाचे हे गीत १९८१ सालच्या 'उंबरठा' चित्रपटात स्मिता पाटीलवर चित्रित झाले आहे. सर्व जण एकेक निघून गेल्यावर सुन्या मैफिलीत एकटीच उरते. या अवस्थेत गतकाळातल्या आठवणींचे सिंहावलोकन डोळ्यांपुढून सरसर सरकते. त्यात रमून नकळत आनंदी भाव चेहऱ्यावर उमटतात; पण लगेच हे आठवणीतले सौख्य असल्याची जाणीव होते. पुन्हा एकांतातील खिन्नता दुपटीने वाढते.

'कळे न मी पाहते कुणाला, कळे न हा चेहरा कुणाचा, पुन्हा पुन्हा भास होत आहे, कुणीतरी आरशात आहे. दिग्दर्शक जब्बार पटेल यांना कुणीतरी शब्द बदलून हवा होता, पण सुरेशजींनी नकार दिला. तिथे उपस्थित ज्येष्ठ कवयित्री शांताबाई शेळके यांनी 'कुणीतरी'ऐवजी 'तुझे हसू' हा शब्द भट यांना विचारून टाकला व वाद मिटवला. तो अंतरा असा झाला. 'तुझे हसू आरशात आहे' स्वरसम्राज्ञीच्या भावव्यतीत स्वराविषयी काय लिहावे! कवीच्या शब्दातील आशयघनता व अभिनय कुशल अभिनेत्री स्मिता पाटील यांच्या चेहर्यावरील बोलके भाव एवढी सामग्री असताना गाण्याचे सोने न होईल तरच नवल! सुरेश भट यांच्या शब्दांवर हृदयनाथांनी अलगद तार छेडावी व अमर गाण्याचा जन्म व्हावा, असेच बहुतेकदा घडायचे. एवढे मात्र खरे की, सुरेशजींच्या अमूल्य शब्दातील अपूर्व कल्पनेला तेव्हढ्याच अपूर्वपणे हृदयनाथांनी प्रत्येक वेळी योग्य न्याय दिला. वरील गाणे १९८९ सालच्या 'निवडुंग' चित्रपटातील आहे. 'उरले उरात काही आवाज चांदण्यांचे आकाश तारकांचे उचलून रात्र गेली' वरील गाण्यातील प्रत्येक अंतरा कवीच्या उत्तुंग प्रतिभेचे दर्शन घडवितो. चांदण्यांचे आवाज ही कल्पनाच किती नाजूक आहे. उत्तुंग काव्य प्रतिभेचे दर्शन होते. तारकांच्या आकाशाला दूर सारून रात्र संपते व तिमिर दूर होतो.

'उषःकाल होता होता काळरात्र झाली अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली' १९७९ सालच्या जब्बार पटेल यांच्या 'सिंहासन' चित्रपटातील वरील गाण्यात सुरेश भट यांनी स्वातंत्र्य मिळाल्यावर देशातील भयानक व विदारक सत्यावर मुक्तपणे लेखणी उगारली व झणझणीत काव्यांजन शोषण करणार्यांच्या नेत्रात टाकले. हे केवळ एक चित्रपट गीत नसून सुरेश भटांनी व्यक्त केलेल्या भावना आहे. निळू फुले हे दिग्गज अभिनेते मार्ग आक्रमित असताना पार्श्वसंगीतात आशाताईंच्या स्वरात हे गीत प्रस्तुत केले आहे. स्वातंत्र्याची पहाट होऊनही अनेक जण लाभ वंचित आहे. तिमिराची खोली रुंदावत आहे, तरीही नैराश्य सोडून आशेच्या मशाली पेटवा हे आव्हानही सुरेशजी देतात. 'आसवेच स्वातंत्र्याची अम्हाला मिळाली' असे खेदाने म्हणतात. तरीही केवळ नैराश्य उगाळीत न बसता 'पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली' असे आव्हानही देतात.

**'मलमली तारुण्य माझे तू पहाटे पांघरावे, मोकळ्या केसात माझ्या तू जिवाला गुंतवावे' १९७० सालच्या 'घरकूल' चित्रपटात दिग्गज संगीतकार सी. रामचंद्र यांच्या संगीतात आशाताईंच्या स्वरात कविवर्य सुरेश भट यांनी वरील गाण्यात शृंगाररसातील शब्द संपत्तीचा अक्षरशः पाऊस पाडला. हे गाणे म्हणजे मलमली शृंगाराची रेशमी गझल! सुरेशजींचे हे गाणे मराठी रसिक विसरू शकत नाही.**

मराठी भाषेत गझल हा काव्यप्रकार रुजू करणारे गझलकार सुरेश भट यांच्या खालील साहित्य कृती प्रसिद्ध आहे. रूपगंधा, रंग माझा वेगळा, एल्गार, झंझावात, सप्तरंग, काफला, रसवंतीचा मुजरा, सुरेश भट यांच्या निवडक कविता, हिंडणारा सूर्य (गद्य) आदी. सुरेश भट यांच्या काही निवडक मराठी गझला-

(१) 'गर्दीत गारद्याच्या सामील रामशास्त्री मेल्याविना मढ्याला आता उपाय नाही' (२) 'फुकाचे काय शब्दांना, मिळे दिव्यत्व सत्याचे घराची राखरांगोळी कपाळी लावितो आम्ही' (३) 'भोगले जे दुःख त्याला, सुख म्हणावे लागते एवढे मी भोगले की मज हसावे लागते.' कविवर्य सुरेश भट यांची काव्य रचण्याची जातकुळीच वेगळी व बाणेदार होती. प्रत्यक्ष प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबराव महाराजांचा 'गाणसोपान' व विष्णू नारायण भातखंडे यांचा 'संगीतखंड' या ग्रंथांना त्यांनी अभ्यासले होते. त्यांच्या शब्दातील खोल व गर्भित अर्थ योजनेवरून ते सिद्ध होते. ते स्वतः उत्कृष्ट बन्सी वादक होते व गायकीही करायचे. संगीत क्षेत्रात त्यांचा भरपूर अभ्यास होता. मराठी चित्रपटात ते योगायोगाने गीतकार झाले. केवळ ५- ६ चित्रपटांना त्यांचे योगदान लाभले असेल. परंतु विजेच्या प्रकाशासारखी त्यांच्या गीतांनी क्षणकाल रसिकाना चमक दाखविली व ते कर्णतृप्त झालेत. सुरेश भट यांनी घरकूल, सिंहासन, उंबरठा, निवडुंग, आम्ही असू लाडके, मनातल्या मनात आदी चित्रपटात मोजकीच गाणी देऊनही प्रतिभावान गीतकाराचा लौकिक प्राप्त केला.

१५ एप्रिल १९३२ रोजी विदर्भातील अमरावती येथे डॉ. श्रीधर व शांताबाई भट या दाम्पत्याच्या उदरी जन्मास आलेले सुरेश भट यांना बालपणापासूनच काव्याची आवड त्यांच्या आईपासून प्राप्त झाली. केवळ तीन वर्षाचे असताना पोलिओच्या दुखण्यात त्यांचा उजवा पाय कायमचा अधू झाला. शरीराने दिव्यांग असूनही संपूर्ण आयुष्य उमेदीने जगले. शालेय व महाविद्यालयीन शिक्षण अमरावतीला झाले. विदर्भ महाविद्यालयातून ते बी. ए. झाले. त्यांनी उर्दू भाषेचाही अभ्यास केला. शिक्षण आटोपल्यावर नागपूरला स्थायिक झाले. तिथे उर्दू व मराठी गझला लोकप्रिय केल्या. नागपूरला गझल मैफिलीत मराठी गझल प्रकार प्रचलित केला. तिथेच त्यांना 'मराठी गझल सम्राट' अशी ख्याती प्राप्त झाली.

वैचारिक दृढतेमुळे जीवनात अतोनात संघर्ष करावा लागला. शेवटपर्यंत आपल्या सिद्धांतावर कायम राहिले. समाजात परिवर्तनाची जिद्द बाळगून जीवन व्यतित करणारे कविश्रेष्ठ सुरेश भट यांच्या जीवनाची मैफिल १४ मार्च २००३ रोजी नागपूर मुक्कामी सुन्न झाली व हा काव्यातील झंझावात नेहमीकरिता शांत झाला. त्यांचीच एक गझल-'इतकेच मला जाताना सरणावर कळले होते मरणाने केली सुटका जगण्याने छळले होते'

**रमेश पोफळी**



# पुन्हा आईची भूमिका करणार नाही

बॉलीवूड अभिनेत्री शेफाली शाह सध्या 'दिल्ली क्राइम' सीझन ३ मधील तिच्या दमदार अभिनयामुळे चर्चेत आहे. शेफालीने करिअरच्या सुरुवातीला २००५ मध्ये आलेल्या 'वक्तः द रेस अगेन्स्ट टाइम' या चित्रपटात अमिताभ बच्चन यांच्या पत्नीची आणि अक्षय कुमारच्या आईची भूमिका केली होती. आता, २० वर्षांनंतर त्या भूमिकेबद्दल शेफालीने मोठा खुलासा केला आहे. वयाने मोठ्या असलेल्या अक्षय कुमारच्या आईची भूमिका करणं हा करिअरसाठी मोठा धक्का होता, असं शेफाली शाहने म्हटलंय. पती व निर्माते विपुल शाह यांनी तो चित्रपट करू नकोस, असं शेफालीला सांगितलं. तिने स्वतः एका मुलाखतीत याबद्दल खुलासा केला आहे.

माझ्या नवऱ्याने मला सांगितलं होतं, हे करू नकोस. अमितजींनी सुचवलं, 'तू या भूमिकेसाठी शेफालीला का घेत नाहीस?' आणि मग ते म्हणाला, 'मला वाटत नाही की ती यासाठी योग्य असेल.' एके दिवशी मी माझ्या केसांमध्ये पावडर लावली आणि म्हणाले, 'बघ, मी वयस्कर आणि प्रौढ दिसू शकते.' तो म्हणाला, 'असं करू नकोस.' पण मी म्हणाले, 'नाही, नाही, मला हे करायचं आहे.' बरं, मी स्वतःच्याच पायावर कुऱ्हाड मारून घेतली, असं शेफाली शाहने नमूद केलं. ही भूमिका साकारल्यानंतर शेफालीला बराच काळ कोणत्याही ऑफर मिळाल्या नव्हत्या. बराच काळ माझं करिअर काम करण्यापेक्षा काम मिळण्याची वाट पाहण्यात गेलं. आता, जेव्हा मी मागे वळून पाहते तेव्हा मला लक्षात येतं माझा रिज्युमे फार मोठा नाही, पण मजबूत आहे. असे एक किंवा दोन चित्रपट असतील जिथे मला वाटलं की मी ते करू नयेत, परंतु त्यापलीकडे, गांधी, माय फादर, द लास्ट लिअर आणि वन्स अगेन, श्री ऑफ या सारखे चित्रपट आहेत.

आता मला दिवसेंदिवस आणखी चांगलं काम मिळत आहे, असं शेफाली शाह म्हणाली. मी वचन देते की मी आयुष्यात पुन्हा कधीच अक्षय कुमारच्या आईची भूमिका करणार नाही, असं एका मुलाखतीत शेफाली शाहने म्हटलं होतं. 'वक्त' सिनेमात काम केलं तेव्हा शेफाली अक्षयपेक्षा पाच वर्षांनी लहान होती. त्यावेळी शेफाली ३२ वर्षांची होती, तर अक्षय ३७ वर्षांचा होता. पण मी ती भूमिका केली. या चित्रपटात अमिताभ बच्चन, अक्षय कुमार, प्रियांका चोप्रा, राजपाल यादव व बोमन इराणी हे कलाकार होते. शेफाली शाहबद्दल बोलायचं झाल्यास ती 'दिल्ली क्राइम सीझन ३' मध्ये पुन्हा वर्तिका चतुर्वेदीच्या भूमिकेत आहे. नवीन सीझनमध्ये रसिका दुग्गल, आदिल हुसेन आणि राजेश तैलंग यांच्यासह हुमा कुरेशीदेखील आहे. तुम्ही ही सीरिज नेटफ्लिक्सवर पाहू शकता.

# रणबीर अन् दीपिका दहा वर्षांनी मोठ्या पडद्यावर एकत्र

गेल्या काही महिन्यांपासून दीपिका पदुकोण वेगवेगळ्या कारणामुळं चर्चेत आहे. मुलगी दुआच्या जन्मापासून ती मोठ्या पडद्यापासून दूर आहे. 'स्पिरिट' आणि 'कल्की २'सारख्या चित्रपटांमधून बाहेर पडल्यानेही ती चर्चेत राहिली. दरम्यान, तिनं शाहरुख खानच्या 'किंग'मध्ये प्रवेश करण्याची घोषणा केली. आता, दीपिकाबद्दल नवीन बातमी समोर आली आहे. दीपिका पदुकोण १० वर्षांनंतर रणबीर कपूरबरोबर स्क्रीन शेअर करणार आहे. 'तमाशा' (२०१५) नंतर रणबीर आणि दीपिका कोणत्याही चित्रपटात एकत्र दिसले नाहीत. यापूर्वी दीपिकानं 'ब्रह्मास्त्र'मध्ये कॅमिओ केला होता, मात्र तिनं रणबीरबरोबर स्क्रीन शेअर केली नव्हती. आता, दीपिका आणि रणबीर अयान मुखर्जी दिग्दर्शित नवीन चित्रपटात एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. 'या' चित्रपटापासून प्रेरित असेल: अयान मुखर्जी 'चोरी चोरी' या क्लासिक चित्रपटापासून प्रेरित असणार असल्याचं सांगितलं जात आहे. १९५६ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटात राज कपूर आणि नर्गिस यांनी प्रमुख भूमिका केली होती. सरळ रिमेकऐवजी, चित्रपटाची टीम मूळ चित्रपटाच्या भावनिक आत्म्याला कायम ठेवत आहे. आजच्या प्रेक्षकांसाठी तयार केलेला आधुनिक टच खूप विशेष असणार आहे. रणबीर कपूरसाठी, हा प्रोजेक्ट भावनिकदृष्ट्या खूप विशेष असणार आहे. कारण हा चित्रपट त्याच्या कुटुंबाच्या महान वारशाला श्रद्धांजली असणार आहे. अयान मुखर्जीनं या चित्रपटात रणबीर कपूरच्या विरुद्ध दीपिका पदुकोणला कास्ट करण्याचा निर्णय घेतला आहे. आता हा चित्रपट प्रेक्षकांसाठी मोठी मेजवाणी असणार आहे. रणबीर कपूर आणि दीपिका पदुकोण एकेकाळी रिलेशनशिपमध्ये होते. या दोघांचं नात 'बचना ए हसीनो' या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान सुरू झाले. यानंतर हे जोडपे २०१०मध्ये वेगळे झाले. दीपिकानं २०१९ मध्ये रणवीर सिंगबरोबर लग्न केलं. या जोडप्यानं २०२४ मध्ये त्यांची मुलगी दुआ हिचे स्वागत केलं. तसेच रणबीर कपूरनं २०२२मध्ये आलिया भट्टबरोबर लग्न केलं. याशिवाय या जोडप्यानं वर्षीच्या अखेरीस त्यांची मुलगी राहाचं स्वागत केलं. दरम्यान या दोघांच्या वर्कफ्रंटबद्दल बोलायचं झालं तर रणबीर हा संजय लीला भन्साळी यांच्या आगामी 'लव्ह अँड वॉर' या चित्रपटमध्ये दिसणार आहे. यामध्ये त्यांच्याबरोबर आलिया आणि विकी कौशल हेही स्टार्स असेल. तसेच त्याच्याकडे 'रामायण' आणि 'ॲनिमल २' हे देखील चित्रपट आहेत.



भूल भुलैया ३'च्या प्रदर्शनाला एक वर्ष पूर्ण झाल्यावर निर्माते अनीस बज्मी यांनी या प्रसिद्ध हॉरर-कॉमेडी पटाचा चौथा भाग येणार असल्याची पुष्टी दिली आहे. अभिनेता कार्तिक आर्यन या फ्रँचाइजीशी जोडलेला राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे रूह बाबाच्या भूमिकेत कार्तिक दिसणार आहे. 'भूल भुलैया ४' चित्रपटावर काम सुरू आहे. या चित्रपटाच्या फ्रेंचाइजीमुळे कार्तिक आर्यनच्या आकर्षक कॉमिक टायमिंगविषयी प्रेक्षकांना कळू शकले असल्याचे वक्तव्य अनीस यांनी केले आहे. माधुरी दीक्षित आणि विद्या बालन या दोन्ही अभिनेत्रींसोबत काम करताना अत्यंत मजा आली. फ्रेंचाइजीच्या चौथ्या भागात नवी अभिनेत्री दिसून येऊ शकते, असे त्यांनी म्हटले आहे. 'भूल भुलैया ३' हा चित्रपट मागील वर्षी नोव्हेंबर महिन्यात प्रदर्शित झाला होता. तसेच तो मागील वर्षातील दुसऱ्या क्रमांकाची कमाई करणारा चित्रपट ठरला होता. या चित्रपटातील कार्तिक आर्यन आणि तृप्ति डिमरी यांची जोडी प्रेक्षकांना पसंत पडली होती.

# 'रूह बाबा'च्या रुपात परतणार कार्तिक



# श्रेयससोबतच्या रिलेशनशिपवरील चर्चांवर मृणालने सोडलं मौन





क्रिकेट आणि बॉलिवूड यांचे एकमेकांशी असलेलं नातं नवीन नाही. कित्येक वर्षांपासून बॉलिवूड अभिनेत्री आणि क्रिकेटपटू यांच्यातील प्रेम प्रकरणांच्या कहाण्या ऐकायला मिळतात. विराट कोहलीपासून ते केएल राहुलपर्यंत अनेक क्रिकेटपटूंनी बॉलिवूड अभिनेत्रींसोबत संसार थाटला आहे. तशातच आता काही दिवसांपासून आणखी एका जोडीची चर्चा रंगली आहे. टीम इंडियाचा उपकर्णधार श्रेयस अय्यर याचे नाव बॉलिवूडची मराठमोळी अभिनेत्री मृणाल ठाकूर हिच्याशी जोडण्यात येत आहे. मृणाल ठाकूर ही एक उत्तम अभिनेत्री आहे. ती तिच्या अभिनयामुळे चर्चेत असते. तिने आतापर्यंत केलेल्या चित्रपटांनी चाहत्यांची वाहवा मिळवली आहे. असे असताना मधल्या काळात मृणाल ठाकूर हिचे नाव साऊथस्टार धनुष सोबत जोडण्यात आले होते. त्या दौघांमध्ये काहीतरी शिजतंय अशा चर्चा रंगल्या होत्या. तशातच आता मृणालचे नाव श्रेयससोबत घेतले जाऊ लागले. त्यामुळे अखेर या अफवांना पूर्णविराम देण्याच्या दृष्टीने तिने एक सूचक इन्स्टा स्टोरी पोस्ट केली. या स्टोरीवर तिने एक व्हिडीओ पोस्ट केला. या पोस्टमध्ये ती केसांना छान मालिश करून घेताना दिसते. तिने या व्हिडीओमध्ये खाली लिहिलेली कमेंट सूचक होती. तिने लिहिले, लोक बोलतात (अफवा पसरवतात), आम्ही हसतो. अफवा म्हणजे फुकटचा पीआर आणि मला फुकटच्या गोष्टी आवडतात. यातून मृणालने श्रेयस सोबतच्या अफवांना पूर्णविराम दिला आहे. तसेच, श्रेयसनेही यावर कुठलीही प्रतिक्रिया न देता, याकडे दुर्लक्षच केले आहे.